हाताने मैला उचलणा-या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन अधिनियम, २०१३ च्या अंमलबजावणीकरीता सक्षम प्राधिकारी घोषित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

## शासन निर्णय क्र. हामैऊ-२०१८/प्र.क्र. १०७/अजाक

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ११/०६/२०१९.

**<u>प्रस्तावना:-</u>**

केंद्र शासनाने हाताने मैला उचलणा-या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे अधिनियम २०१३ (२०१३ चा २५) पारीत केल्या असून सदर कायदा दि. ६ डिसेंबर, २०१३ पासून लागू केला आहे.

या अधिनियमांतर्गत केंद्र शासनाने नियम केले असून सदर नियम १२ डिसेंबर, २०१३ च्या भारत सरकारच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहेत.

उपरोक्त अधिनियम व त्या अंतर्गत केलेले नियम यांची अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

केंद्र शासनाने “हाताने मैला उचलणा-या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे अधिनियम २०१३” (२०१३ चा २५) पारीत केला आहे व त्या अंतर्गत केलेले नियम भारत सरकारच्या दि. १२ डिसेंबर, २०१३ च्या राजपत्रात प्रसिध्द केले आहेत.

या अधिनियमाच्या व नियमांच्या अमंलबजावणीसाठी अधिनियमाच्या कलम १८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना व स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत यांचे आयुक्त, मुख्याधिकारी यांना तसेच ग्रामीण भागाकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी व स्थानिक स्वराज्य संस्था (महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद नगर पंचायती) यांचे आयुक्त/मुख्य अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व गटविकास अधिकारी, पंचायत समिती हे त्यांचे काही किंवा पूर्ण अधिकार तसेच काही किंवा पूर्ण कर्तव्ये त्याच्या कनिष्ठ स्तरावरील अधिका-यांना प्रदान करु शकतील. तसेच हे अधिकार किंवा कर्तव्ये बजावण्याचे त्यांचे कार्यक्षेत्र सुध्दा निश्चित करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०६१२१२०९४७३४२२ असा आहे. हा शासन निर्णय डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sunil D Sardar

Digitally signed by Sunil D Sardar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0098eb68042c66b72115bc62ef9206ece42981aab126657128d7cadca447533, cn=Sunil D Sardar
Date: 2019.06.12 11:54:02 +05'30'

**(सुनिल सरदार)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. मा.मुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.राज्य मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व अमुस प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. आयुक्त, समाजकल्याण, पुणे,
८. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरिक्षा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
९. सर्व जिल्हाधिकारी,
१०. सर्व प्रादेशिक उप आयुक्त, समाजकल्याण,
११. सर्व सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण,
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१३. निवडनस्ती (अजाक)